पोलीस ठाणे सोयगाव ता. सोयगाव जि. औरंगाबाद (ग्रा.)



# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District** (जिल्हा): औरंगाबाद ग्रामीण **P.S.**(ठाणे): सोयगांव **Year** (वर्ष): 2022

**FIR No.**(प्रथम खबर क्र.): 0110 **Date and Time of FIR** (प्र. ख. दिनांक आणि वेळ): 07/07/2022 17:21 बजे

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. **(a) Occurrence of offence** (गुन्ह्याची घटना):

1. **Day**(दिवस): गुरुवार **Date From** (दिनांक पासून): 07/07/2022

**Time Period** (कालावधी): पहर 5 **Date To** ( दिनांक पर्यंत): 07/07/2022

**Time From** (वेळेपासून): 13:41 बजे

**Time To** (वेळेपर्यंत): 13:50 बजे

**(b) Information received at P.S.** (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):

**Date** (दिनांक ): 07/07/2022 **Time** (वेळ): 17:13 बजे

**(c) General Diary Reference** (रोजनामचा संदर्भ

**Entry No.** (नोंद क्र.): 014 **Date & Time** (दिनांक आणि वेळ): 07/07/2022 17:13 बजे

4. **Type of Information** (माहितीचा प्रकार): लेखी

5. **Place of Occurrence** (घटनास्थळ):

1. **(a) Direction and distance from P.S.**(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर): पश्चिम, 30 किमी

**Beat No.** (बिट क्र.):

**(b) Address** (पत्ता): वरठाण चौफुली, वरठाण,सोयगाव

**(c) In case, outside the limit of this Police Station, then** (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):

**Name of P.S.**(पोलीस ठाण्याचे नाव):

**District(State)** (जिल्हा(राज्य)):

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

**(a) Name** (नाव): राजेंद्र लक्ष्मण सोनवणे

**(b) Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

**(c) Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1982 **(d) Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

**(e) UID No.** (यु.आय.डी. क्र.):

**(f) Passport No.**(पारपत्र क्र.): **Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

**(g) Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

**(h) Address** (पत्ता):

(h) Address (पत्ता):

| S.No.(अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पत्ता | वरठाण,सोयगाव,सोयगांव,औरंगाबाद ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पत्ता | वरठाण,सोयगाव,सोयगांव,औरंगाबाद ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |

(i) Occupation (व्यवसाय):

(j) Phone number (फोन नं.): Mobile (मोबाइल नं.): 91-9823463780

7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पत्ता) |
|---|---|---|---|---|
| 1 | विजय पिराजीराव जोंधळे | | | 1. गाडगेबाबनगर जुना अंतुरली रोड,रा पाचोरा,ता पाचोरा,पाचोरा,जळगाव, महाराष्ट्र,भारत |

8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|
| 1 | इतर | संकीर्ण/विविध | 500 रु. दराच्या 10 चलनी नोटा | 5,000.00 |

10 Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)): 5,000.00

11 Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12 First Information contents (प्रथम खबर हकीकत ):

फिर्याद दिनांक 07/07/2022 मी राजेंद्र लक्ष्मण सोनवणे वय 40 वर्ष धंदा शेती रा वरठाण पोस्ट तिडका ता सोयगाव जि. औरंगाबाद मो.क्र. 9823463780.समक्ष हजर राहुन फिर्याद देतो की, मी दिनांक 20/06/2022 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय, औरंगाबाद येथे मला होत असलेल्या लाचमागणी बाबतची तक्रार दिली होती ती पुढीलप्रमाणे, मी समक्ष लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय औरंगाबाद येथे हजर राहुन तक्रार देतो की, मी वरील ठिकाणी माझ्या कुटूंबासह राहत असुन शेती करतो. मौजे वरठाण ता सोयगाव जि औरंगाबाद येथे आमची गट नं 226 मध्ये जमीन असुन सदर गट नंबर मध्ये आईच्या नावे 76 आर जमीन आहे. सन 2021 मध्ये माझी आई मंगलाबाई लक्ष्मण सोनवणे हिचे नावे तसेच आमच्या गावातील योगेश प्रभाकर निकम यांची गट नं 90 ब, अण्णा तुकाराम कोटकर यांची गट नं 55, सत्तार खा गफार खा पठाण यांची गट नं 114 मध्ये रोजगार हमी योजना अंतर्गत नविन विहीरी मंजुर झालेल्या आहे. सदर विहीरीचे काम माहे जाने 2022 पासुन चालु झालेले असुन विहीरीवरील मजुरांचे हजेरीपट भरण्याचे काम ग्रामपंचायतचे रोजगार सेवक श्री. शिंदे हे करीत आहे. हजेरी मस्टर रोजगार सेवक यांनी भरल्यानंतर त्यावर सही करण्यासाठी ग्रामसेवक श्री. जोंधळे यांनी आम्हा लाभार्थ्यांकडे प्रत्येकी 5,000/- रूपये असे 20,000/- रूपये मागितले. त्यानंतर नाईलाजास्तव आम्ही वेळोवेळी ग्रामसेवक श्री. जोंधळे यांना 7,000/- रूपये दिले. अंदाजे पंधरा दिवसापुर्वी ग्रामपंचायत कार्यालय वरठाण येथे जावुन ग्रामसेवक श्री. जोंधळे यांची भेट घेवुन मजुरांचे हजेरीपटावर सही करण्याची विनंती केली असता ग्रामसेवक श्री. जोंधळे यांनी सही करण्यासाठी माझे आईचे व इतर तिघांचे असे 13,000/- रूपयाची माझेकडे मागणी केली. पैसे दिले नाही तर सह्या करणार नाही असे ग्रामसेवक म्हणाले. त्यावेळी मी त्यांना नाईलाजास्तव नंतर येऊन भेटतो असे म्हणुन निघुन आलो आहे. मला ग्रामसेवक श्री. जोंधळे यांना लाच देण्याची इच्छा नाही तसेच त्यांचेशी माझी कोणतीही वैरत्ष्मनी नाही किंवा देणे घेण्याचा अगर उसनवारीचा व्यवहार नाही. मी दिनांक 22/06/2022 रोजी ग्रामपंचायत कार्यालय वरठाण ता. सोयगाव जि. औरंगाबाद येथे जाऊन ग्रामसेवक श्री. जोंधळे यांची भेट घेवुन कामासंबधाने बोलणार आहे. त्यावेळी त्यांनी माझ्याकडे माझे आईचे व वरील इतर तिघांचे रोजगार हमी योजना अंतर्गत चालु असलेल्या विहीरीवरील मजुरांचे हजेरीपटावर सही करण्यासाठी लाचेची मागणी करून लाचेची रक्कम स्वत: किंवा इतरामार्फत स्विकारल्यानंतर त्यांना पकडुन कायदेशिर कारवाई करावी हि विनंती.अशी तक्रार दिली होती.माझे तक्रारीचे अनुषंगाने पडताळणी करणेकामी शासकिय दोन पंचांना पोलीस निरीक्षक श्री. संदीप राजपुत यांनी दिनांक 20/06/2022 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय येथे बोलावुन त्यांचा ओळख परिचय करून देवुन त्यांची नावे 1) श्री. राजेंद्र रामचंद्र थोरात, वय 47 वर्षे, व्यवसाय- नोकरी, मजुर, महानगरपालिका वड क्र. G सिलेखाना औरंगाबाद रा. शेरणा हौ.सो. पहाडसिंगपुरा, औरंगाबाद. 2) श्री. सत्यनारायण नंदय्या नागुला, वय 55 वर्ष, व्यवसाय- नोकरी, कनिष्ठ सहाय्यक, बांधकाम

विभाग, जिल्हा परिषद औरंगाबाद रा. घर नं. 4-18-20 भोईवाडा, औरंगाबाद असे असल्याचे सांगितले. मी माझी तक्रार पंचांना तोंडी सांगितली. त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री. राजपुत यांनी मी हस्तलीखीत दिलेली तक्रार पंचांना वाचण्यास दिली. पंचांनी ती वाचल्यानंतर पोलीस निरीक्षक श्री. राजपुत व पंचांनी सदर तक्रारीवर सह्या केल्या. त्यानंतर दिनांक 22/06/2022 रोजी श्री जोंधळे ग्रामसेवक हे माझ्या गावात वरठाण येथे येणार आहेत तेव्हा मी त्यांची भेट घेण्यास जाणार असल्याने पोलीस निरीक्षक श्री. राजपुत यांनी मला, पंचांना व सापळा पथकास गोपनीयतेच्या सुचना देवुन दिनांक 22/06/2022 रोजी सापळा पथक व पंच यांना लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय येथे हजर राहणेबाबत तसेच मला वरठाण गावच्या अलीकडे सुरक्षीत ठिकाणी येण्याचे सांगुन आम्हास जाण्याची परवानगी दिली. दिनांक 22/06/2022 रोजी पोनी श्री राजपुत हे सापळा पथकासह वरठाण गावाच्या अलीकडे आले असल्याचे त्यांनी मला संपर्क करुन सांगितले तेव्हा मी त्यांना सांगीतले की, श्री जोंधळे ग्रामसेवक यांना मोबाईलद्वारे संपर्क केला असता श्री जोंधळे यांनी मी पाचोरा येथे राहण्यास असुन मला ईकडेच काम आहे त्यामुळे आज गावात येणार नाही तुम्हाला हजेरीपटावर अर्जेन्ट सह्या पाहीजे असेल तर तुम्ही पाचोरा येथे या असे सांगितल्याने त्यामुळे मी पाचो-याच्या अलीकडे सुरक्षीत ठिकाणी जावुन थांबतो तुम्ही पाचो-याच्या अलीकडे सुरक्षीत ठिकाणी या. त्यानंतर आम्ही पचो-याच्या अलीकडे सुरक्षीत ठिकाणी भेटलो.त्यानंतर मी श्री जोंधळे यांना मोबाईलद्वारे संपर्क केला असता त्यांनी मला रिलायन्स पेट्रोल पंम्प पाचोरा जि जळगाव येथे येवुन भेटण्याचे सांगीतले. तेथे मला पो नि राजपुत यांनी सुचना देवुन व्हाईस रेकर्डर मध्ये नवीन मेमरी कार्ड टाकुन व्हाईस रेकर्डर चालु करुन माझे जवळ देण्यात आले. मी पंच क्र.1 श्री. थोरात यांना सोबत घेवुन माझेकडील कार क्रमांक एमएच-20 बीएन-1365 ने श्री जोंधळे यांची भेट घेण्यासाठी रिलायन्स पेट्रोल पंप येथे गेलो असता ते दिसुन न आल्याने त्यांना पुन्हा संपर्क करुन विचारले असता ते रिलायन्स पेट्रोल पंपच्या बाजुला स्टपवर थांबले असल्याचे सांगितल्याने त्यांच्याकडे जावुन त्यांची भेट घेतली असता आमच्या मध्ये कामासंबधाने चर्चा होवुन श्री जोंधळे यांनी मला मजुरांच्या हजेरीपटावर सह्या करण्यासाठी तडजोडी अंती 5,000/- रुपये पंचासमक्ष लाचेची मागणी करुन लाचेची रक्कम ग्रामसेवक श्री. जोंधळे हे गावात आल्यानंतर देण्याचे ठरले. त्यानंतर मला पोनि राजपुत यांनी मला सांगीतले की, ग्रामसेवक श्री जोंधळे हे वरठाण गावात आल्यानंतर आम्हास संपर्क करुन कळवावे. तेव्हा सापळा लावण्याचा निर्णय माझ्या व पंचांच्या संमतीने पोलीस निरीक्षक श्री. राजपुत यांनी घेतला.आज दिनांक 07/07/2022 रोजी श्री जोंधळे हे वरठाण गावात आल्याबाबत मी पोनि राजपुत यांना संपर्क करुन कळविले. त्यानंतर पोनि श्री राजपुत असे सापळा पथक व दोन पंचासह वरठाण गावाच्या अलीकडे सुरक्षित ठिकाणी शासकिय वाहनाने आले. तेथे पोलीस निरीक्षक श्री. राजपुत यांनी मला, सापळा पथकास व दोन्ही पंचास सापळा कारवाईचे अनुषगाने सुचना दिल्या. मी पोलीस निरीक्षक श्री राजपुत यांना श्री जोंधळे हे वरठाण चौफुली येथे थांबलेले असल्याचे सांगुन श्री जोंधळे यांना लाच म्हणुन देण्याकरीता 500/- रुपये दराच्या 10 चलनी नोटा मी हजर केल्या. त्यावेळी मला व पंचांना ऍन्थ्रासिन पावडरच्या गुणधर्माबाबत प्रात्यक्षिक करुन दाखविले. मी हजर केलेल्या नोटांना ऍन्थ्रासीन पावडर लावुन माझे पन्टचे समोरील उजव्या बाजुचे खिशात ठेवण्यात आल्या. व्हाईस रेकर्डर मध्ये नवीन मेमरी कार्ड टाकुन व्हाईस रेकर्डर चालु करुन माझेकडे देण्यात आले. पोलीस निरीक्षक श्री. राजपुत यांचे सुचनेप्रमाणे मी पंच क्र.1 श्री. थोरात यांना सोबत घेवुन माझेकडील हॉण्डा कंपनीची एमएच-20 ईव्ही-2235 ने वरठाण चौफुली येथे गेलो. पाठोपाठ पोलीस निरीक्षक श्री. राजपुत, सापळा पथक व पंच क्र.2 श्री. वारे असे कोणास संशय येणार नाही अशा रीतीने सापळा लावुन थांबले. त्यानंतर मी वरठाण चौफुली येथे जावुन श्री जोंधळे यांना भेटलो. पंच क्र. 1 श्री. थोरात हे आमचे बाजुस थांबले. माझी श्री. जोंधळे यांचेशी थोडावेळ चर्चा झालेनंतर तेथेच मागणी प्रमाणे 5,000/- रुपये लाचेची रक्कम माझेकडुन श्री. जोंधळे यांनी स्वत: स्विकारुन त्यांचे पन्टचे उजव्या बाजुचे समोरील खिशात ठेवली. त्यानंतर मी 13.41 वाजेच्या सुमारास पुर्वनियोजीत इशारा करताच पोलीस निरीक्षक श्री. राजपुत, सापळा पथक पंच क्र.2 श्री. वारे यांचेसह तेथे हजर आले. त्यावेळी पोलीस निरीक्षक श्री. राजपुत यांनी श्री. जोंधळे यांना ओळख परिचय देवुन त्यांचे नाव पत्ता विचारले असता, त्यांनी त्यांचे नाव श्री विजय पिराजीराव जोंधळे वय 47 वर्ष धंदा ग्रामविकास अधिकारी रा सुनिल बागुल यांच्या घरी किरायाने गाडगेबाबानगर जुना अंतुरली रोड पाचारो ता पाचोरा जि जळगाव असे सांगितले. श्री. जोंधळे ग्रामसेवक यांचे पन्टचे उजवे बाजुचे समोरील खिशातुन लाचेची रक्कम 5,000/- रुपये पंचासमक्ष जप्त करण्यात आली असुन सदर नोटांचे क्रमांक व वर्णन मी हजर केलेल्या नोटांशी तंतोतंत जुळुन आले आहे. अशा प्रकारे दिनांक 22/06/2022 रोजी लाचमागणी पडताळणी मध्ये श्री. विजय पिराजीराव जोंधळे वय 47 वर्ष धंदा ग्रामविकास अधिकारी रा सुनिल बागुल यांच्या घरी किरायाने गाडगेबाबानगर जुना अंतुरली रोड पाचारो ता पाचोरा जि जळगाव यांनी माझ्याकडे माझे आईचे व इतर तिघांचे रोजगार हमी योजना अंतर्गत चालु असलेल्या विहीरीवर काम करणारे मजुरांचे हजेरीपटावर सही करण्यासाठी श्री.जोंधळे यांनी तडजोडी अंती 5,000/- रुपये पंचासमक्ष लाचेची मागणी केली. मागणी प्रमाणे 5,000/- रुपये लाचेची रक्कम दिनांक 07/07/2022 रोजी 13.41 वाजता वरठाण चौफुली वरठाण गाव ता सोयगाव जि औरंगाबाद येथे पंचासमक्ष माझेकडुन श्री. विजय जोंधळे यांनी स्वत: स्विकारली आहे, म्हणुन माझी त्यांचेविरुध्द कायदेशीर फिर्याद आहे. समक्ष हि फिर्याद दिली

**13.Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at**
(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमुद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरुन अपराध घडल्याचे.)

**(1) Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले): SUDAM DHARMRAJ SHIRSAT(I (Inspector)) / API **or (किंवा)**

**(2) Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):
**Rank (पद):**
**No.(क्र.):** **to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or (किंवा)**

**(3) Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

**(4) Transferred to P.S.**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

**14. Signature/Thumb impression of the complainant / informant.**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

R.C. Sonawane

**15. Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer incharge, Police Station**

**Name** (नाव): SUD[illegible]SHIRSAT

**Rank**(पद): I (Inspector)

**No.**(सं.): API